PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 4

# “प्रतीत्य समुत्पादाची देण”

**डॉ. सुनील काळमेघ**

विभाग प्रमुख, तत्वज्ञान विभाग

महात्मा फुले कला वाणिज्य व सितारामजी चौधरी

विज्ञान महाविद्यालय, वरुड

महाराष्ट्र भारत

प्रतीत्य समुत्पादाचा सिध्दांत मानवी जीवनाशी निगडीत आहे. आस्तिक दर्शनामध्येही कर्म सिध्दांत सांगितला आहे. विशेषत: भगवत गीतेमध्ये व्यक्तीला कर्मानुसार जन्म मिळतो. व्यक्तीने निष्काम वृत्तीने कर्म करावे. कर्मे करण्यापुरताच व्यक्तीला अधिकार आहे. कर्म फळाचा व्यक्तीने विचार करु नये. या गीतेतील निष्काम कर्मयोगाचा समाजातील अनेक व्यक्तींनी चूकीचा अर्थ घेतला आणि व्यक्ती प्रयत्नवादापासून दूर गेल्या नशीब, लक फॅक्टर इ. शब्दांच्या पाठीमागे लागून कठोर परिश्रम, अथक परिश्रम न केल्यामुळे त्यांची ध्येय पुर्ण होऊ शकली नाही.

महात्मा गौतम बुध्दांनी प्रतीत्य समुत्पादात असे प्रतिपादन केले आहे की, कोणतीही घटना पुर्व लिखीत किंवा पुर्वनियेजित नसते. कोणत्याही घटनेवर ईश्वराचे नियंत्रण नसते. व्यक्ती आपल्या स्वत:च्या कर्मामुळेच स्वत:मध्ये आश्चर्यकारक बदल घडवून आणू शकते. फक्त त्याचा स्वत:वर आणि स्वत: केलेल्या कर्मावर विश्वास असणे गरजेचे आहे. महात्मा बुध्दांनी कोणत्याही एका संप्रदायासाठी

PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 4

वा व्यक्तीसाठी प्रतीत्यसमुत्पाद सिध्दांत सांगितला नाही तर संपुर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी हा सिध्दांत सांगितला कारण ज्या प्रमाणे गरीबांना दु:ख आहे. त्याचप्रमाणे श्रीमंत व्यक्तींनाही दु:ख आहे बुध्दाच्या धम्माचे ध्येय हे काही स्वर्गप्राप्ती किंवा ईश्वर साक्षात्कार हे नाही तर व्यक्तीने नैतिक आचरण करावे, हे आहे. नैतिकतेचे जीवन स्वत:वर विजय प्राप्त केल्यावरच संभव आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये दुसऱ्याप्रती प्रेम करुणा असली पाहिजे जीवन कशामुळे उत्पन्न होते आणि त्याला कशापध्दतीने थांबवता येते याचे विश्लेषण प्रतीत्य समुत्पादाच्या सिंध्दातात केलेले आहे. या सिध्दांतामुळेच व्यक्तीला शिकवण देता येते की, गरीबी नित्य नाही आणि शोषणही नित्य नाही त्याला आपण समाप्त करु शकतो. फक्त कोणत्याही गोष्टीचे मुळकारण शोधले तर त्या गोष्टीचे निराकरण करता येते. दृढ विश्वासाने जीवनाचा प्रवाह पार होतो परिश्रमाने (उद्योगाने) जीवनसागर पार करता येतो.

मनाच्या स्थिरतेने सर्व दु:ख कलह शांत होतात आणि प्रज्ञेच्या अभ्यासातून चित्त निर्मल होते. बुध्द म्हणतात दृढ विश्वासाच्या अभ्यासामुळे कठीणातील कठीण समस्यांचे निराकरण होते. दृढ विश्वास ठेवण्यासाठी स्थिर मन व विवेक आवश्यक आहे. जगात अशी कोणतीही वस्तू नाही की जी अभ्यासाने असे शिक्षण मिळू शकत नाही. देशाच्या संरक्षणासाठी सैनिक जवानांना शिक्षण दिले जाते. अतिशय कठीण शिक्षण घेवून जवान लडाख व पहलगाम क्षेत्रातील अतीदुर्गम भागात थांबून ते देशाचे संरक्षण करतात अभ्यासाशिवाय हे अशक्य आहे.

कर्माचा संबंध प्रतीत्य समुत्पादाशी आहे. एकीच्या अस्तित्वाने दुसरीचे अस्तित्व येते. एकाच्या नाशाने दुसऱ्याचा नाश होतो. याच आधारावर सुख किंवा दु:ख या पुर्व नियोजित वस्तु नाहीत बहुतांश घटना आपण केलेल्या कर्माच्या आधारावर घडतात. परंतू प्रत्येक घटनेच्या कारणाशी संबंध प्रस्थापित करणे वा त्याचा शोध लावणे व्यक्तीच्या कल्पना शक्तीच्या आवाक्या बाहेर आहे.

प्रतीत्यसमुत्पाद सिध्दांत व्यक्तीला चांगले कार्य करण्यासाठी प्रवृत करतो. जर या प्रवृत्तीचा व्यक्तीत अभाव असेल तर प्रेमाची भावना, करुणेची भावना, चांगले कार्य, शील यांना काहीही अर्थ राहणार नाही.

सर्व काही दैवी शक्तीवर सोडून फक्त आपण मातीची बाहूली बनायचे, हि स्थिती निराशावादाची आहे. सर एडवीन अर्नोल्ड असे म्हणतात की, तुला दैवी देवतांची आराधना करुन काहीही मिळत नाही. तु स्वत:च स्वत:च्या प्रगतीसाठी प्रयत्न कर. या जगात कारणाशिवाय काहीही घडत नाही.

या भौतिक जगातील प्रत्येक वस्तु एकमेकावर आधारीत आहे. म्हणून स्थिर अशी कोणतीही वस्तू नाही. मी किंवा अविनाशी आत्मावर बहुतेक व्यक्ती विश्वास ठेवतात. मात्र संसारातील आपल्या वाट्याला आलेली सर्व कर्मे अतिशय कौशल्यपुर्ण रितीने आपण केली पाहिजेत, निरासक्त भावनेने केली पाहिजेत एखादे कर्म मला चांगल्यात चांगले करायचे आहे, हिच भावना व्यक्तीची असावी. कर्म सिध्दांतानुसार चांगल्या कर्माचे फळ चांगले तर मिळणारच आहे आणि व्यक्तीने माझे जीवन अनित्य आहे. एवढेच नव्हे तर आजचा दिवसा माझा या जागातील शेवटचा दिवस आहे, असे समजून आचरण केले की, व्यक्तीच्या हातून कोणत्याही प्रकारचे वाईट कृत्य घडू शकत नाही स्वत:च्या सुख दु : खाबाबत प्रत्येक व्यक्तीने स्वत: प्रयत्न केले पाहिजे. व्यक्ती स्थिर मनाच्या अभ्यासातून स्वत:चे रक्षण करीत धैर्य, सहनशीलता, अहिंसा, प्रेम, दया व प्रज्ञेच्या अभ्यासातून दुसऱ्याच्या रक्षणापासून स्वत:चेही रक्षण करते नामरुपा पासून विज्ञान निर्माण होते व विज्ञान नामरुपामुळे निर्माण होते. दोघांची निर्मिती ही एकमेकांवर अवलंबून आहे. अशाचप्रकारे स्वत:च्या सरंक्षणातच इतरांचे रक्षण आहे. व इतरांच्या रक्षणातच स्वत:चे रक्षण आहे. व्यक्ती स्वत:च्या रक्षणाचा अर्थ स्वार्थ भावनेशी लावतात मात्र याचा

अर्थ वेगळा आहे. मी एखाद्यावर परोपकार केला ही मानसिक संतुष्टता व्यक्तीला खपू आनंद देवून जाते आणि ती त्याच्या रक्षणाचे कारण बनते.

कर्म आहे म्हणून त्यांचे सतत परिणाम आहेत. कर्माची उत्पत्ती सतत होत असते. तेच प्रतीत्य समुत्पन्न आहे. प्रतीत्यसमुत्पाद सिध्दांतामुळे समाजात क्रांती घडली. ही सृष्टी आणि येथील सर्व सजीवांचे कार्य हे दैवी शक्तीव्दारे नियंत्रित होते. या जन्मात जे जे घडते ते ते सर्व पुर्वजन्मात केलेल्या कर्मानुसारच घडते. अशाप्रकारची विचारधारा जशीच्या तशी राहीली असती आणि व्यक्तीने प्रयत्नवादाचा आधार घेतला नसता. प्रतीत्यसमुत्पादाच्या सिध्दांतामुळे व्यक्ती प्रयत्नवादी बनली. त्यामुळे व्यक्तीला प्रत्येक कार्यात यश मिळत गेले. परिणामी व्यक्ती सुखी व आनंदी बनली वेळेचा सदुपयोग करायला शिकली. स्वत:ला कुशल कर्मात गुंतवूण घेतले. त्यामुळे जीवनातील निरसता व कंटाळा यांचा नाश झाला. आणि ती व्यक्ती उत्साही बनली दिवसभर मनाला व शरीराला कुशल कर्मात गुंतवल्यामुळे वेळेवर व्यक्ती आराम करायला शिकली. एकंदरीत, व्यक्तीच्या जीवनाचा कायापालट झाला. तिच्यामध्ये झालेल्या परिवर्तनामुळे तिच्या सहवासातील व्यक्तीतही परिवर्तन झाले. अज्ञानाचा नाश झाला, शांततामय वातावरण निर्माण झाले. या सिंध्दातामुळे आपल्या गरीब परिस्थितीचे त्या व्यक्तींना कारण उमजले, समजले. विसाव्या शतकात समाजसुधारकांनी उपेक्षित समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केल्यामुळे त्यांनी स्वत:ला ओळखले त्यांनी समाजव्यवस्था समजून घेतली व महत्वाचे म्हणजे स्वत:च्या सामाजिक व आर्थिक विषमतेला समजून घेतले. त्यांचे कारण त्यांना सापडले त्यांनी स्वत:ची बुध्दी वापरली आणि सर्वांगीण बदल झाला. हि खऱ्या अर्थाने प्रतीत्यसमुत्पादाची देण आहे. कार्यकारण मीमांसेची देण आहे.

कार्यकारण पंरपरेनुसार कोणतीही घटना आपल्या आधीच्या घटनेचे कारण होते व ती स्वत: नंतरच्या अन्य घटनेचे कारण होते. अशाप्रकारे हे कार्यकारणी भवचक्र सतत चालू राहते.

प्रतीत्यसमुत्पादामध्ये बारा अंगे आहेत. अविद्या, संस्कार विज्ञान, नामरुप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाती, जरामरण इ.

अविधा म्हणजे चार आर्थसत्याविषयीचे अज्ञान होय. जग हे नित्यनसून ते नित्य मानणे. जगातील सर्व वस्तु अनित्य असतानाही त्याला नित्य मानणे ही अविद्या आहे. व्यक्तीच्या अधोगतीला अविद्या हिच कारणीभूत आहे.

पुर्वजन्मातील इच्छा, वासना, मनोवृत्ती हे संस्कार आहेत. संस्कारापासून विज्ञान उत्पन्न होते. संस्कार हे 1) कायिक संस्कार 2) वाचिक संस्कार, 3) मानसिक संस्कार तीन प्रकारचे असतात. या तीनही संस्कारापासून विज्ञानाची निर्मिती होते.

विज्ञानापासून नामरुपाची उत्पत्ती होते. संस्कारानुसार पुढील जन्मात बुध्दीची जी ठेवण बनते तिलाच विज्ञान म्हणतात. नामरुपापासून षडायतन उत्पन्न होते. नामरुप म्हणजे चैतन्यशरीर नामालाच मन किंवा अंतर्जगत असे म्हणतात आणि रुप म्हणजे बाह्यरुप किंवा आपला देह त्यालाच बाह्य जगतही म्हणतात. रुप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान या पंचस्कंधानी एकत्रित आल्यावर मनुष्यदेह निर्माण होतो.

षडायतनापासून स्पर्श उत्पन्न होतो. शरीरापासून इंद्रिये व इंद्रियापासून स्पर्शाची उत्पत्ती होते. स्पर्शापासून वेदना निर्माण होतात. इंद्रियाचा विषयवस्तुशी जो संबंध येतो त्याला स्पर्श म्हणतात. स्पर्श ज्ञानासाठी इंद्रियाची जशी आवश्यकता आहे तशीच मनाची ही आवश्यकता आहे.

वेदनेपासून तृष्णा निर्माण होते. स्पर्शातून जे जाणले जाते, त्याला वेदना म्हणतात. तृष्णेपासून उपादन निर्माण होतात. सुखकारक विषयभोगांची इच्छा म्हणजेच तृष्णा होय. तृष्णेला कारणीभुत इंद्रिये आहेत. हि तृष्णाच सर्व दु:खाची जननी आहे. तृष्णेमुळे उपादानाची निर्मिती होते.

उपादानापासून भव निर्माण होते. उपादान म्हणजेच आसक्ती किंवा विषयप्रेम. आसक्तीतून भोगवासना प्रबळ होतात व इंद्रियांना वासनेचाच ध्यास लागतो.

भवपासून जाती निर्माण होते. भव म्हणजे जन्म देणे जातीपासून जरामरण उत्पन्न होते. भव आहे म्हणून जाती आहे. दु:खाची सुरुवातच जातीपासून होते. जन्मपासून होते जन्महाच जरामरणाचा हेतू, निदान, कारण आहे जीवनात येणारी दु:खे एकमेकाशी जोडलेली आहेत. दु:खाचे मुख्य कारण जन्म आहे जन्मच नसता तर समोरील सर्व क्रिया उत्पन्न झाल्या नसत्या आणि जन्म तृष्णेमुळे होतो. म्हणूनच तृष्णेचाच अंत केला पाहिजे.

प्रतीत्यसमुत्पाद हि दु:खाचे कारण शोधणारी परंपरा आहे किंवा नियम आहे. हा नियम एकमेकांवर अवलंबून असलेल्या बारा कारणांना व त्यांच्या परिणामांना लागू होतो.

## संदर्भ ग्रंथ सुची

1) मुंशीलाल गौतम :- बुध्दाचा मानवतेला संदेश, शिक्षण संस्कृती समिती प्रकाशन

2) डॉ. ग.ना. जोशी :- भारतीय तत्वज्ञानाचा बृहद इतिहास

3) पी.डी. चौधरी :- भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपुर

4) श्री. ह. दिक्षीत :- भारतीय तत्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापुर

5) सिंधू डांगे :- बौध्द धर्म आणि तत्वज्ञान, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे